**स्वातंत्र्यदिनी राज्यभर विक्रमी आरोग्य संस्थांचे लोकार्पण; ग्रामीण आरोग्य सेवेला नवी ताकद मिळणार : मंत्री प्रकाश आबिटकर** >> पान 2

**अजित डोवाल यांचे राष्ट्रसेवेतील योगदान प्रेरणादायी - केंद्रीय गृहमंत्री अमित शाह** >> पान 3

**केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव शेतकऱ्यांच्या बांधावर** >> पान 4


सुविचार


प्न पाहायची हिम्मत ठेवा, तीच सुरुवात असते.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 18 ■ रविवार, दि. 02 ऑगस्ट 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


**कार्तिक आर्यननं आसाम पूरग्रस्तांसाठी १ कोटींची दिली देणगी, मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी मानले आभार** आतील पान


## समता बँकेतील १०८ बनावट खातेप्रकरणी अशोक खरातला सात दिवसांची पोलीस कोठडी

**अहिल्यानगर । प्रतिनिधी :** समता बँकेतील १०८ संशयित खात्यांच्या गाजलेल्या प्रकरणातील मुख्य आरोपी अशोक खरातला शनिवारी (दि.१) राहता न्यायालयानं सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात सरकारी पक्ष आणि बचाव पक्षाचा सविस्तर युक्तिवाद झाल्यानंतर न्यायालयानं हा आदेश दिला. आरोपीच्या चौकशीतून बँकेतील अधिकाऱ्यांची भूमिका, मोठ्या प्रमाणात झालेले आर्थिक व्यवहार आणि या संपूर्ण रॅकेटमागील इतर व्यक्तींचा सहभाग समोर येण्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे.

## मुंबईत जिल्हास्तरीय 'नशा मुक्त भारत अभियान' स्पर्धा संपन्न


**मुंबई। प्रतिनिधी :** : माय भारत, मुंबई, राष्ट्रीय सेवा योजना आणि पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या एम. एल. डहाणूकर कॉलेज ऑफ कॉमर्स (स्वायत्त), विलेपार्ले (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय नशा मुक्त भारत अभियान स्पर्धाचे काल (३१ जुलै) आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनचे अध्यक्ष सीए अनिल गानू यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी संस्थेचे मानद सचिव दिलीप पेठे, माय भारत, मुंबईचे उपसंचालक अनुप इंगोले, पीटीव्हीए इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या संचालक डॉ. तेजश्री देशमुख, विलेपार्ले पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक चैत्राली साबळे तसेच एम. एल. डहाणूकर कॉलेज ऑफ कॉमर्स (स्वायत्त)चे प्राचार्य प्रा. डॉ. विनय भोळे उपस्थित होते.

उपसंचालक अनुप इंगोले यांनी नशा मुक्त भारत अभियान आणि स्पर्धांच्या उद्देशाविषयी माहिती दिली. प्राचार्य प्रा. डॉ. विनय भोळे यांनी युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृतीसाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. पोलीस निरीक्षक चैत्राली साबळे यांनी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीविषयी मार्गदर्शन केले.

## कल्याण स्टेशनच्या परिसरात एकाला नग्न करून मारहाण, काही तासांनी हमालावरही चाकू हल्ला

**कल्याण । प्रतिनिधी :** नेहमी गर्दी आणि वाहतूक कोंडीमध्ये हरवलेल्या कल्याण रेल्वे स्थानक परिसरामध्ये दिवसेंदिवस परिस्थितीत चिघळत चालली आहे. अशातच आता कल्याण स्टेशन परिसरात मागली २४ तासात तीन धक्कादायक घटना घडल्या आहे. काही तृतीयपंथीयांनी एका इसमाला पकडून नग्न करून बेदम मारहाण केली. तर स्टेशनवरच एका हमालावर चाकू हल्ला करण्यात आला आहे. या घटनांमुळे कायद्याचा धाक आहे की नाही, असा सवाल उपस्थितीत केला जात आहे.

कल्याण स्टेशन परिसरातील २४ तासात तीन धक्कादायक घटना समोर आल्याने स्टेशन परिसर सुरक्षित राहिला नसल्याचं समोर येत आहे. शुक्रवारी सायंकाळी इथे मारहाणीची घटना घडली.




# गुजरात, केरळमध्ये मुसळधार; आसाममधील मृतांचा आकडा ८२

## केरळममध्ये भूस्खलन, ७ मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :** गुजरातमध्ये मुसळधार पावसामुळे अनेक जिल्ह्यांत पुरासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. सुरतमध्ये सर्वाधिक २४ इंच पाऊस नोंदवला गेला, तर इतर १२ क्षेत्रांमध्ये १० इंचांपेक्षा जास्त पाऊस नोंदवला गेला. हवामान विभागाने गुजरात आणि केरळम राज्याच्या अनेक जिल्ह्यांसाठी 'रेड अलर्ट' जारी केला आहे.

दरम्यान, आसाममध्ये पुरामुळे गेल्या २४ तासांत आणखी दोन जणांचा मृत्यू झाला आहे. आतापर्यंत पूरबळींची संख्या ८२ वर पोहोचली आहे. केरळममध्येही सततच्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत पूर आणि भूस्खलन होऊन दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. इडुक्की आणि कोट्टायम जिल्ह्यांत दरडी कोसळण्याच्या वेगवेगळ्या घटनांमध्ये सात लोकांचा मृत्यू झाला असून, अनेकजण ढिगाऱ्याखाली गाडले गेल्याची भीती वर्तवली जात आहे. मुसळधार पावसामुळे जम्मू-श्रीनगर महामार्ग बंद असून, त्यामुळे जम्मूवरून निघणारी अमरनाथ यात्रा स्थगित करण्यात आली आहे.

जम्मू-काश्मीरमधील किश्तवाड जिल्ह्यातील छत्रू भागात ढगफुटी झाली. काही व्यावसायिक आस्थापना आणि दुकानांमध्ये पाणी शिरून नुकसान झाले आहे. ही घटना शनिवारी पहाटे ३.३० वाजता घडली. सुदैवाने आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. उपायुक्त पंकज कुमार शर्मा यांनी सांगितले की, तातडीने यंत्रणांना घटनास्थळी पाठवण्यात आले असून, प्रभावित भागातून ढिगारे व चिखल बाजूला करण्याचे काम सुरू आहे.

**आसामात पूरसंकट कायम**

आसाममधील पूरस्थिती हळूहळू सुधारत असली, तरी संकट अद्याप पूर्णपणे टळलेले नाही. गेल्या २४ तासांत शिवसागर जिल्ह्यात आणखी दोन जणांचा मृत्यू झाल्यामुळे यंदाच्या पुरामुळे मृतांची संख्या वाढून ८० झाली आहे. यात एका लहान मुलाचाही समावेश आहे.



**अहमदाबाद : गुजरातमधील मोरबी येथे शनिवारी (दि. १ ऑगस्ट ) झालेल्या मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या काळात स्थानिक नागरिक दोरखंडाच्या साहाय्याने पुराच्या पाण्यातून बाहेर काढण्यासाठी मदतकार्य करताना बचाव पथके. (फोटो : पीटीआय)**

राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी राज्याच्या आठ जिल्ह्यांतील २,१२,४०० लोक अद्यापही पुरामुळे प्रभावित आहेत आणि ४३७ गावे पाण्याखाली आहेत.

चराईदेव जिल्ह्यात सर्वात जास्त परिणाम झाला असून, सुमारे ८० हजार लोक प्रभावित आहेत. शिवसागरमध्ये सुमारे ७१ हजार लोक प्रभावित झाले आहेत. चार जिल्ह्यांमध्ये ११२ निवारा छावण्या आणि मदत वितरण केंद्रे चालवली जात आहेत, जिथे ७५,५८३ विस्थापित लोकांनी आश्रय घेतला आहे.

मान्सूनचा पाऊस आणि हवामानातील बदलांमुळे दिल्ली-एनसीआरमध्ये इन्फ्लूएंझाचे रुग्ण वाढले आहेत. एम्स, दिल्लीच्या वैद्यकीय विभागाचे प्रा. डॉ. संजीव सिन्हा यांनी सांगितले की, मान्सूनमध्ये तापमान कमी होते आणि तापमानातील बदलामुळे इन्फ्लूएंझा विषाणू वेगाने पसरतो. रुग्णांना घसा खवखवणे, नाक वाहणे, कोरडा खोकला आणि डोकेदुखी यांसारख्या समस्या जाणवत आहेत.

### विविध राज्यांसाठी हवामानाचा इशारा

ऑरेंज अलर्ट : पूर्व राजस्थान, मध्य महाराष्ट्र,

गोवा आणि कर्नाटक

यलो अलर्ट : पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, हरियाणा, दिल्ली आणि बिहारसह १२ राज्यांत 'यलो अलर्ट'

## अँटिलिया स्फोटके आणि मनसुख हिरेन हत्या प्रकरण

# सचिन वाझे, प्रदीप शर्मासह १० जणांवर ५ वर्षानंतर अखेर आरोप निश्चित!

**मुंबई । प्रतिनिधी :** देशातील उद्योगपती आणि रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया या निवासस्थानाबाहेर स्फोटकांनी भरलेली गाडी ठेवल्याप्रकरणी आणि व्यावसायिक मनसुख हिरेन यांच्या हत्येप्रकरणी एक मोठी अपडेट समोर आली आहे. मुंबईतील विशेष एनआयए न्यायालयाने या बहुचर्चित प्रकरणात बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे आणि माजी एन्काउंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा यांच्यासह एकूण दहा जणांवर अधिकृतरीत्या आरोप निश्चित केले आहेत. यामुळे तब्बल पाच वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर या हायप्रोफाइल खटल्याच्या प्रत्यक्ष सुनावणीचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे.

आरोपींनी दाखल केलेले डिस्चार्ज अर्ज आणि विविध कायदेशीर प्रक्रियांमुळे गेली पाच वर्षे आरोप निश्चितीची प्रक्रिया रखडली होती. मात्र, आता विशेष न्यायालयाने कठोर पावले उचलत या सर्व आरोपींविरुद्ध बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायदा () आणि भारतीय दंड संहितेतील हत्या, गुन्हेगारी कट रचणे यांसारख्या अत्यंत गंभीर कलमांखाली आरोप निश्चित केले आहेत. या निर्णयामुळे आता साक्षीदारांची साक्ष नोंदवण्याची प्रक्रिया सुरू होऊन खटल्याची सुनावणी वेगाने पुढे सरकणार आहे.



दक्षिण मुंबईतील मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया या निवासस्थानाजवळ २५ फेब्रुवारी २०२१ रोजी एक बेवारस संशयित स्कॉर्पिओ गाडी उभी असल्याचे आढळले होते. या गाडीची तपासणी केली असता त्यात जिलेटिनच्या २० कांड्या आणि थेट धमकी देणारे एक पत्र सापडले होते. या घटनेमुळे संपूर्ण देशात आणि राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली होती.

या धक्कादायक घटनेच्या अवघ्या १० दिवसांत, म्हणजेच ५ मार्च २०२१ रोजी संबंधित स्कॉर्पिओ गाडीचे मालक मनसुख हिरेन यांचा मृतदेह मुंब्रा येथील खाडीत अत्यंत संशयास्पद स्थितीत आढळून आला. मनसुख हिरेन यांची हत्या पोलीस अधिकारी सचिन वाझे आणि त्यांच्या साथीदारांनीच घडवून आणल्याचा थेट आणि गंभीर आरोप हिरेन यांच्या कुटुंबीयांनी केला होता.

या प्रकरणाचा प्राथमिक तपास महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाकडे होता. मात्र, प्रकरणाची व्याप्ती आणि गांभीर्य विचारात घेऊन केंद्रीय गृह मंत्रालयाने हा तपास तात्काळ राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे वर्ग केला. एनआयएने तपासाची चक्रे वेगाने फिरवत मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचत घटनेचा मुख्य सूत्रधार आणि कट रचल्याप्रकरणी सचिन वाझे, कटात सहभाग आणि पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी एन्काउंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मा, विनायक शिंदे, नरेश गोर, रियाझुद्दीन काझी यांच्यासह एकूण १० जणांना बेड्या ठोकण्यात आल्या.

**पाच वर्षांनंतर न्यायालयीन प्रक्रियेला वेग**

या प्रकरणात आरोपींकडून दाखल करण्यात आलेले डिस्चार्ज अर्ज आणि विविध कायदेशीर याचिकांमुळे आरोप निश्चित करण्याची प्रक्रिया दीर्घकाळ प्रलंबित होती. अखेर विशेष न्यायालयाने सर्व अर्जांवरील सुनावणी पूर्ण करून आरोप निश्चित केले आहेत. आता साक्षीदारांची साक्ष, पुराव्यांची नोंद आणि अन्य न्यायालयीन प्रक्रिया सुरू होणार असल्याने या हायप्रोफाइल प्रकरणाच्या सुनावणीला गती मिळण्याची शक्यता आहे.

## मुंबईवरून पुण्याला निघाला असाल तर थांबा... प्रचंड वाहतूक कोंडी, टोल नाक्यावर लांबच लांब रांगा

**नवी मुंबई । प्रतिनिधी :** शनिवार आणि रविवारच्या वीकेंडच्या सुट्टीचा आनंद घेण्यासाठी घराबाहेर पडणाऱ्या पर्यटकांमुळे मुंबई-पुणे मार्गावर वाहनांची प्रचंड गर्दी झाली आहे. नवी मुंबईमार्गे पुण्याच्या दिशेने प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी समोर येत आहे. सायन-पनवेल महामार्गावर अत्यंत भीषण वाहतूक कोंडी झाली असून खारघर टोलनाका ते कळंबोली दरम्यान पुण्याकडे जाणाऱ्या मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

शनिवार आणि रविवार अशा सलग सुट्ट्या आल्याने मुंबई आणि उपनगरातील नागरिक मोठ्या संख्येने लोणावळा, खंडाळा आणि आसपासच्या पर्यटन स्थळांकडे रवाना झाले आहेत. पर्यटकांच्या गाड्या एकाच वेळी रस्त्यावर आल्यामुळे वाहतुकीचा प्रचंड ताण वाढला आहे. खारघर टोलनाका पार करताना वाहनांचा वेग मंदावला असून पुढे कळंबोली सर्कलपर्यंत गाड्या रांगेत उभ्या असलेल्या पाहायला मिळत आहेत.

भरपूर वेळ वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागत असल्याने वाहनचालक आणि प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. मंद गतीने सरकणारी वाहतूक यामुळे महामार्गावर वाहनांची भली मोठी रांग लागली आहे. वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलीस प्रयत्न करत असले तरी पर्यटकांच्या गाड्यांचा ओघ सतत सुरूच आहे.या पार्श्वभूमीवर महामार्ग पोलीस आणि वाहतूक विभागाने वाहनचालकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

मुंबईहून पुण्याच्या किंवा लोणावळ्याच्या दिशेने निघणाऱ्या वाहनचालकांनी प्रवासासाठी नेहमीपेक्षा जास्त वेळ हाताशी ठेवूनच घराबाहेर पडावे.शक्य असल्यास खारघर-कळंबोली मार्गाऐवजी पर्यायी मार्गाचा वापर करावा किंवा वाहतूक कोंडी कमी होईपर्यंत प्रवास पुढे ढकलावा. प्रवासाला निघण्यापूर्वी वाहतुकीची ताजी अपडेट पाहूनच घराबाहेर पडणे प्रवाशांच्या दृष्टीने सोयीचे ठरेल, असे प्रशासकडून कळविण्यात आले आहे.

## एअर मार्शल तेजपाल सिंह यांनी हवाई दलाच्या उपप्रमुखपदाची सूत्रे स्वीकारली

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :** एअर मार्शल तेजपाल सिंह एव्हीएसएम व्हीएम यांनी ०१ ऑगस्ट २६ रोजी हवाई दलाचे उपप्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. यावेळी त्यांनी राष्ट्रीय युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण केले आणि देशसेवेसाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शूरवीरांना आदरांजली वाहिली. १६ जून १९९० रोजी लढाऊ वैमानिक म्हणून सेवेत रुजू झालेल्या एअर मार्शल तेजपाल सिंह यांच्याकडे ३५०० तासांहून अधिक हवाई उड्डाणाचा अनुभव आहे. ते 'कॅट ए' क्वालिफाइड उड्डाण प्रशिक्षक आणि एक्सपेरिमेंटल टेस्ट पायलट आहेत. एअर मार्शल तेजपाल सिंह यांनी भारतीय हवाई दलात प्रमुख ऑपरेशनल, कमांड आणि स्टाफ पदे भूषवली आहेत.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील 'मोतीबिंदूमुक्त विदर्भ' अभियानाला मोठी गती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महत्त्वाकांक्षी 'मोतीबिंदूमुक्त विदर्भ' संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (आयजीजीएमसी), नागपूर आणि वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (डब्ल्युसीएल) यांच्यात यासाठी ५ कोटींचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. या निधीच्या माध्यमातून 'नमो नेत्र संजीवनी' कार्यक्रमाची विदर्भात




प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असून, मार्च २०२७ पर्यत विदर्भातील ११ जिल्ह्यांमध्ये २५ हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

या उपक्रमांतर्गत सर्व शस्त्रक्रिया शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक सुविधांच्या माध्यमातून करण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील हजारो नागरिकांना दर्जेदार व मोफत नेत्रोपचार उपलब्ध होणार असून, त्यांच्या दृष्टीचे संरक्षण करण्यास मोठी मदत होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विशेष पाठबळामुळेच आयजीजीएमसी, नागपूरला या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ५ कोटींचा निधी उपलब्ध झाला आहे. या निधीमुळे संपूर्ण विदर्भात व्यापक स्तरावर मोतीबिंदू शस्त्रक्रिया राबविणे शक्य होणार असून, 'मोतीबिंदूमुक्त विदर्भ' हे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

या उपक्रमामुळे केवळ मोतीबिंदूमुळे दृष्टी गमावण्याचे प्रमाण कमी होणार नाही, तर समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही दर्जेदार नेत्रोपचार सहज उपलब्ध होतील. सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात शासन, वैद्यकीय संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग यांच्या समन्वयातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून, 'नमो नेत्र संजीवनी' कार्यक्रमाद्वारे विदर्भातील हजारो नागरिकांच्या जीवनात नवा प्रकाश निर्माण होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# स्वातंत्र्यदिनी राज्यभर विक्रमी आरोग्य संस्थांचे लोकार्पण; ग्रामीण आरोग्य सेवेला नवी ताकद मिळणार : मंत्री प्रकाश आबिटकर

## ८० टक्के बांधकामे झालेल्या आरोग्य संस्था प्राधान्याने पूर्णत्वास नेण्याचा निर्णय ठरला मैलाचा दगड

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी** : राज्यातील आरोग्य पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी ८० टक्क्यांहून अधिक बांधकामे पूर्ण झालेल्या आरोग्य संस्थांना युद्धपातळीवर कार्यान्वित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय, तसेच बांधकाम पूर्णत्वास येत असतानाच आवश्यक वैद्यकीय यंत्रसामग्री, फर्निचर, मनुष्यबळ आणि इतर सुविधा उपलब्ध करून देण्याच्या विभागाच्या निर्णयामुळे स्वातंत्र्यदिनी राज्यात प्रथमच मोठ्या संख्येने आरोग्य संस्थांचे लोकार्पण होत आहे.



राज्यातील उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, ट्रॉमा केअर युनिट, स्त्री रुग्णालय अशा विविध आरोग्य सुविधा नागरिकांच्या सेवेत दाखल होत आहेत. राज्यातील नागरिकांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार आणि तातडीच्या आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या राज्य शासनाच्या धोरणाला यामुळे मोठी चालना मिळणार आहे.


जत, घनसावंगी, अंबड, बदलापूर, खर्डी, मोखाडा, डहाणू, सांगोला, कोंढाळ, ब्रह्मपुरी, वाडी (बु.), वाशीम, धुळे आदी ठिकाणांवरील आरोग्य संस्था उद्घाटनासाठी सज्ज आहेत. तसेच चंद्रपूर, धुळे, पुणे, जळगाव, बीड, छत्रपती संभाजीनगर, वाशीम, बुलढाणा आणि सोलापूर येथील विविध आरोग्य प्रकल्पही नागरिकांच्या सेवेत दाखल होत आहेत. या प्रकल्पांमध्ये आधुनिक ट्रॉमा केअर सेंटर, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये आणि प्रशिक्षण केंद्रांचा समावेश आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान () आणि १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून उभारण्यात आलेल्या नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि ब्लॉक सार्वजनिक आरोग्य युनिट्सची कामेही पूर्णत्वास आली आहेत. नागपूर, गडचिरोली, सांगली, सिंधुदुर्ग, नांदेड आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये नवीन आरोग्य सुविधा उभारण्यात आल्या असून, आवश्यक उपकरणे, मनुष्यबळ आणि प्रशासकीय पूर्तता करण्यात आली आहे. सर्व संस्था कार्यान्वित होण्यासाठी सज्ज करण्यात आल्या आहेत. यामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना उपचारांसाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागणार नाही. अपघातग्रस्त, हृदयरुग्ण, माता-बालक तसेच आपत्कालीन रुग्णांना स्थानिक स्तरावरच अधिक गुणवत्तापूर्ण आणि वेळेवर उपचार मिळणार आहेत. याचबरोबर आरोग्य कर्मचाऱ्यांनाही अधिक सुसज्ज कार्यपरिसर उपलब्ध होणार आहे.

याबाबत सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने आरोग्य सेवा सर्वसामान्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला आहे. अनेक वर्षे विविध कारणांनी ज्या आरोग्य संस्थांची कामे रखडलेली होती व ज्यांची ८० टक्क्यांहून अधिक बांधकामे झाली आहेत, त्यांना प्राधान्याने पूर्णत्वास नेण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्या सर्व संस्था आधुनिक सुविधांसह नागरिकांच्या सेवेत दाखल होत आहेत. पूर्णत्वास येत असलेल्या उर्वरित आरोग्य संस्थांचेही 'आरोग्य संवाद' यात्रेदरम्यान लवकरच लोकार्पण करण्यात येणार आहे.''

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने होत असलेले हे विक्रमी लोकार्पण राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला नवे बळ देणारे ठरणार असून, ''सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा'' हे राज्य शासनाचे उद्दिष्ट अधिक प्रभावीपणे साकार करण्याच्या दिशेने हा ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे.

## शिर्डीत गुरुभक्तीचा महापूर! ३ दिवसांत साईबाबांच्या चरणी ७.८१ कोटींची देणगी



**शिर्डी :** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या श्री गुरुपौर्णिमा उत्सवाला यंदाही देश-विदेशातील साईभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. साईबाबांना आपले सद्गुरू मानणाऱ्या लाखो भाविकांनी साईचरणी नतमस्तक होत गुरुदक्षिणा म्हणून भरभरून दान अर्पण केलं. गुरुपौर्णिमा उत्सवाच्या अवघ्या तीन दिवसांत संस्थानला ७ कोटी ८१ लाख १३ हजार रुपयांची देणगी प्राप्त झाली. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा सुमारे दीड कोटी रुपयांनी वाढ झाली असून, गेल्या वर्षीचा विक्रम मोडला असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

साईबाबा संस्थानच्या वतीनं यदांच्या वर्षी २८ जुलै २०२६ ते शुक्रवार ३० जुलै २०२६ या तीन दिवसांच्या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या गुरुपौर्णिमा उत्सवात सुमारे तीन लाखांहून अधिक साईभक्तांनी साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेतलं. या दरम्यान भाविकांनी दक्षिणा पेटीत रोख स्वरूपात २ कोटी ४ लाख ३५ हजार ५५७ रुपये अर्पण केले. देणगी काऊंटरवर १ कोटी २५ लाख ४७ हजार ९३५ रुपये तसेच पीआरओ कार्यालयामार्फत ८७ लाख १४ हजार रुपये, तर डेबिट-क्रेडिट कार्ड, ऑनलाइन देणगी, धनादेश चेक, डीडी आणि मनी ऑर्डरद्वारे एकूण २ कोटी ७ लाख ८४ हजार ७०१ रुपये संस्थानला प्राप्त झाले. याशिवाय परकीय चलनाद्वारे ५ लाख ६५ हजार ९९१ रुपयांची देणगी मिळाली. याचबरोबर भाविकांनी रोख रकमेबरोबरच सुवर्ण आणि रौप्य दागिनेही मोठ्या प्रमाणात अर्पण केले.

या कालावधीत १,१२५.५७० ग्रॅम सोने प्राप्त झाले असून त्याचे मूल्य १ कोटी ४६ लाख ७४ हजार ५४४ रुपये इतके आहे. तसेच २,३७६.५०० ग्रॅम चांदी प्राप्त झाली असून तिचे मूल्य ३ लाख ९० हजार ६४९ रुपये इतके प्राप्त झाले असल्याची माहिती, गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

गुरुपौर्णिमा उत्सवाच्या तीन दिवसांत श्री साईबाबा प्रसादालयामध्ये १ लाख ९४ हजार २८५ साईभक्तांनी प्रसाद भोजनाचा लाभ घेतला. तसेच ३९ हजार ६११ अन्नप्रसाद पाकिटांचे वितरण करण्यात आले. साई दर्शन रांगेतील १ लाख ६५ हजार २०० साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद पाकिटांचे वाटप करण्यात आले. याशिवाय सशुल्क प्रसादरूपी लाडू पाकिटांच्या विक्रीतून संस्थानला ७१ लाख ७ हजार ३६० रुपयांचे उत्पन्न प्राप्त झालं.

तीन लाख भाविकांनी घेतलं साईसमाधीच दर्शन : मागील वर्षीच्या गुरूपार्णिमा उत्सवात साईभक्तांनी साईबाबांना बाबांना गुरू मानत साईचरणी गुरुपोर्णिमा उत्सवात तीन लाख भाविकांनी साई समाधीचं दर्शन घेतलं. तसेच या उत्सव काळात तीन दिवसात ६ कोटी ३१ लाख ३१ हजार रुपयांची देणगी प्राप्त झाली. तर या यंदाच्या गुरुपौर्णिमा उत्सवाच्या तीन दिवसात भाविकांनी तब्बल ७ कोटी ८१ लाख १३ हजार रुपयांची देणगी साईबाबांच्या चरणी अर्पण केली. यंदा मागील वर्षाचा विक्रम मोडला असून तब्बल दीड कोटींनी वाढ झाली असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

# 'शासन आपल्या दारी'सोबत आता समाधानही

## विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे प्रतिपादन

### महसूल विभागाच्या शिबिरातून नागरिकांच्या तक्रारींवर समाधानकारक कार्यवाही

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई। प्रतिनिधी** : महसूल विभागाच्या सेवा आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आयोजित करण्यात आलेले 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान' हे शासन आणि जनता यांच्यातील परस्पर संबंध अधिक घट्ट करणारा उपक्रम आहे. 'शासन आपल्या दारी' या संकल्पनेपुढे जाऊन नागरिकांच्या तक्रारी व अर्जांवर समाधानकारक कार्यवाही करण्याचे काम या शिबिराच्या माध्यमातून होत आहे, असे प्रतिपादन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केले.

मुंबई शहर जिल्ह्यात दि. २२ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ या कालावधीत प्रत्येक विधानसभा मतदारसंघात 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान' आयोजित करण्यात आले. या अभियानातील अंतिम शिबिराचे आयोजन १८७-कुलाबा विधानसभा मतदारसंघातील रामा आणि सुंदरी वाटूमल सभागृह, के. सी. महाविद्यालय, चर्चगेट येथे करण्यात आले. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर बोलत होते.

छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतल्यावर रयतेसाठीचा संघर्ष, न्याय आणि हक्कांसाठी त्यांनी केलेले कार्य आठवते. त्यांच्या विचारांवर आधारित सक्षम महसूल व्यवस्था निर्माण करण्याचे



काम शासन करीत आहे. महसूल विभाग हा शासनाच्या अत्यंत महत्त्वाच्या विभागांपैकी एक असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी त्याचा थेट संबंध आहे. मालमत्ता नोंदणीपासून दुष्काळ, पूर आदी नैसर्गिक आपत्तींच्या वेळी पंचनामे करण्यापर्यंत अनेक महत्त्वाची कामे महसूल विभागामार्फत केली जातात, असे नार्वेकर यांनी सांगितले.

कुलाबा विधानसभा मतदारसंघात आर्थिकदृष्ट्या विविध स्तरातील नागरिक वास्तव्यास आहेत. प्रत्येक नागरिकाला शासनाच्या सेवा सहज आणि पारदर्शकपणे मिळणे आवश्यक आहे. या शिबिरामुळे नागरिकांचा वेळ वाचत असून विविध सेवा एकाच छताखाली उपलब्ध होत आहेत. देश विकसित राष्ट्राच्या दिशेने वाटचाल करीत असताना सक्षम आणि लोकाभिमुख महसूल व्यवस्था महत्त्वाची भूमिका बजावेल, असेही त्यांनी नमूद केले.

एक लाख नागरिकांपर्यंत समाधान शिबिराच्या माध्यमातून पोहोचलो जिल्हाधिकारी आंचल गोयल

मुंबई शहर जिल्ह्यात २२ जुलैपासून २ ऑगस्टपर्यंत विधानसभा मतदारसंघनिहाय आयोजित करण्यात आलेल्या समाधान शिबिरांच्या माध्यमातून सुमारे एक लाख नागरिकांपर्यंत पोहोचता आले. महसूल दिनाच्या दिवशी या अभियानातील अंतिम शिबिर होत असून, नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला, असे मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी सांगितले.

एप्रिल ते जून या कालावधीत मुंबई शहर जिल्ह्यात सुमारे साडेसात लाख नागरिकांना विविध प्रकारचे दाखले वितरित करण्यात आले.१ ऑगस्ट महसूल दिनानिमित्त मागील वर्षीचा लेखाजोखा सांगतांना, जिल्ह्याला ४९० कोटी रुपयांच्या महसूल वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापेक्षा अधिक म्हणजे ७७९ कोटी रुपयांची महसूल वसुली करण्यात आली असून, निर्धारित उद्दिष्टाच्या १६० टक्के कामगिरी जिल्ह्याने साध्य केली आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

गेल्या वर्षभरात महसूल विभागाच्या कामकाजात संगणकीकरणावर विशेष भर देण्यात आला. प्रशासकीय कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. नागरिकांना कार्यालयांमध्ये वारंवार येण्याची आवश्यकता भासू नये आणि त्यांना आवश्यक सेवा सुलभपणे मिळाव्यात, यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी गोयल यांनी सांगितले.

**जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शताब्दीपूर्तीनिमित्त विशेष टपाल आवरणाचे अनावरण**

मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कार्यक्रमात विशेष टपाल आवरणाचे अनावरण करण्यात आले. भारतीय टपाल विभागाच्या माध्यमातून या ऐतिहासिक टप्प्याची नोंद करण्यात आली.

भारतीय टपाल विभागाच्या,जीपीओ निर्देशक रेखा रिजवी यांनी सांगितले की, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शताब्दीपूर्तीनिमित्त विशेष आवरण आणि स्मरण टपाल तिकीट तयार करण्यात आले आहे. मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयाने गेल्या १०० वर्षांत लोकाभिमुख प्रशासनाची महत्त्वपूर्ण परंपरा जपली आहे. हे विशेष टपाल आवरण पुढील पिढ्यांसाठी, संशोधकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी या ऐतिहासिक वाटचालीची आठवण ठरेल. जिल्हाधिकारी कार्यालयाची यशस्वी वाटचाल पुढेही सुरू राहो, अशी शुभेच्छा त्यांनी दिल्या.

**मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयाची १०० वर्षांची गौरवशाली वाटचाल**

मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. शतकभराच्या या वाटचालीत महसूल प्रशासन, नागरिकांना विविध शासकीय सेवा उपलब्ध करून देणे, नैसर्गिक आपत्तीच्या काळात प्रशासनाची भूमिका बजावणे, मालमत्ता व महसूलविषयक कामकाज तसेच शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

## इंडोपॅसिफिक हा जगातील सर्वात गतिमान आर्थिक प्रदेश आहे

भारताची 'ॲक्ट इस्ट पॉलिसी' ही केवळ पूर्वेकडील देशांशी संबंध वाढवण्याची रणनीती नसून, इंडोपॅसिफिक प्रदेशात आर्थिक, सामरिक आणि तंत्रज्ञानात्मक भूमिका मजबूत करण्याचा व्यापक प्रयत्न आहे. जपान, इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडसोबत वाढणारे सहकार्य या धोरणाला नवी दिशा देत आहे. चीनच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्र्वभूमीवर भारतासाठी ही भागीदारी प्रादेशिक स्थैर्य आणि धोरणात्मक स्वायत्ततेसाठी महत्त्वाची ठरत आहे. भारताची 'ॲक्ट इस्ट पॉलिसी' ही २०१४ मध्ये सुरू झालेली परराष्ट्र धोरणाची महत्त्वाकांक्षी दिशा आहे. पूर्वीची 'लूक इस्ट पॉलिसी' ही मुख्यतः आर्थिक सहकार्यापुरती मर्यादित होती. परंतु 'ॲक्ट इस्ट' ने त्याला धोरणात्मक, सुरक्षा आणि सांस्कृतिक परिमाण दिले. ही बदललेली दिशा भारताच्या व्यापक इंडोपॅसिफिक दृष्टिकोनाशी जोडलेली आहे आणि ऊर्जा आयात, पुरवठा साखळीचे विविधीकरण व प्रादेशिक सांस्कृतिक संबंध यांना नवा आधार देते. त्यामुळे हे धोरण केवळ परराष्ट्र मंत्रालयापुरते मर्यादित नसून व्यापार, संरक्षण आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांचा एकत्रित आराखडा आहे. इंडोपॅसिफिक हा जगातील सर्वात गतिमान आर्थिक प्रदेश आहे. पण त्याचबरोबर चीनच्या वाढत्या प्रभावामुळे तो स्पर्धा आणि तणावाचा केंद्रबिंदू ठरला आहे. भारतासाठी ही दिशा घोषवाक्यापुरती मर्यादित नसून समान विचारांच्या लोकशाही देशांबरोबर सहकार्य आणि धोरणात्मक स्वायत्ततेसाठी अपरिहार्य आहे. जपानच्या पंतप्रधान साने ताकाइची यांच्या भारत भेटीने या धोरणाला ठोस गती दिली. या भेटीत १२ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक गुंतवणुकीची घोषणा झाली आणि संरक्षण तंत्रज्ञान, सेमीकंडक्टर, कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या क्षेत्रांत शंभरहून अधिक करार झाले. नौदलासाठी अँटेना प्रणालीच्या सहविकासाचा करार हा संरक्षण सहकार्याचा नवा टप्पा आहे. ऊर्जा सुरक्षेसाठी कच्चे तेल साठवणूक, समुद्री वाहतूक आणि १००० बायोगॅस प्रकल्प उभारणीसारखे उपक्रमही ठरले. या सर्व उपक्रमांचा उद्देश चीनकेंद्रित पुरवठा साखळीवरील अवलंबित्व कमी करणे आणि पूर्व व दक्षिण चीन समुद्रातील सुरक्षेला बळकटी देणे हा आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदींचा इंडोनेशियातील चालू दौरा संरक्षण आणि खनिज सहकार्यावर केंद्रित आहे. इंडोनेशियाने ब्रह्मोस क्षेपणास्त्र तसेच 'स्ट्रा' एअरटूएअर क्षेपणास्त्र प्रणाली खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. सबांग बंदराचा विकास हा भारतासाठी सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. कारण तो मलक्का सामुद्रधुनीजवळ आहे. निकेल, कॉपर, बॉक्साईट आणि टिन यांसारख्या महत्त्वाच्या खनिजांमध्ये सहकार्य भारताच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणासाठी आवश्यक आहे. याशिवाय इंडोनेशियासाठी खास इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे आणि आयआयएम बंगळूरचे कॅम्पस उभारणीसारखे उपक्रम या संबंधांना व्यापक बनवतात. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमधील आगामी दौरेही तितकेच महत्त्वाचे ठरणार आहेत. क्वाड भागीदार म्हणून ऑस्ट्रेलिया भारताच्या इंडोपॅसिफिक सुरक्षा आराखड्यात मध्यवर्ती आहे. युरेनियम पुरवठा, महत्त्वाची खनिजे आणि सायबर सुरक्षा यावर करार अपेक्षित आहेत. द्विपक्षीय व्यापार आधीच ५४ अब्ज ऑस्ट्रेलियन डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे. संरक्षण सहकार्य संयुक्त सराव आणि समुद्री जागरुकतेद्वारे वाढत आहे. न्यूझीलंडला भारतीय पंतप्रधानांचा दौरा हा जवळपास चार दशकांनंतर होत असला तरी द्विपक्षीय संवाद आणि सहकार्य सातत्याने सुरू राहिले आहे. यापूर्वी झालेल्या मुक्त व्यापार करारामुळे ९५ टक्के न्यूझीलंड निर्यात शुल्कमुक्त झाली आहे, तर भारतीय वस्तूंनाही सवलती मिळाल्या आहेत. ५००० भारतीय व्यावसायिकांसाठी विशेष व्हिसा आणि विद्यार्थ्यांसाठी नवे मार्ग खुले झाले आहेत. २० अब्ज डॉलर्सची दीर्घकालीन गुंतवणूक ही या संबंधांना आर्थिक बळकटी देते. या सर्व भेटी आणि करारांमुळे 'क्ट इस्ट पॉलिसी'ला नवा आयाम मिळाला आहे. संरक्षण, अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञान यांचा संगम करून भारताने इंडोपॅसिफिकमध्ये आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मात्र, आव्हानेही आहेत. करार केवळ औपचारिकतेपुरते मर्यादित राहू नयेत यासाठी ठोस अंमलबजावणी यंत्रणा आवश्यक आहे. देशांतर्गत उत्पादन क्षमता, संशोधन आणि नियामक तयारी वाढवणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. चीनच्या वाढत्या प्रभावाने भारताची धोरणात्मक संयमाची परीक्षा घेतली आहे. बराच काळ भारताने बीजिंगच्या संवेदनशीलतेचा विचार केला; पण त्यातून फारसे लाभ मिळाले नाहीत. आता जपान, इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडसोबतची भागीदारी ही चीनच्या दबावाला प्रतिकार करणारी ठोस पावले आहेत. -डए-छ देशांनाही भारताच्या या सक्रिय भूमिकेचा फायदा होतो. कारण त्यांना चीनच्या वर्चस्वाला पर्याय हवा आहे. चीनने दक्षिण चीन समुद्रात केलेल्या कृतींमुळे अनेक देश अस्वस्थ झाले आहेत. भारताचे सहकार्य त्यांना संतुलन देणारे ठरते आणि प्रादेशिक स्थैर्याला नवा आधार मिळतो. भारताने आपली धोरणात्मक स्वायत्तता ठामपणे मांडली पाहिजे आणि संरक्षण, अर्थव्यवस्था व तंत्रज्ञानातील सहकार्य कोणत्याही संकोचाशिवाय वाढवले पाहिजे. 'इंडोपॅसिफिक ओशन्स इनिशिएटिव्ह'सारख्या प्रादेशिक मंचांमध्ये या करारांचा समावेश करून भारताने नेतृत्वाची भूमिका निभावली पाहिजे. हे उचकावणे नाही, तर इंडोपॅसिफिक खुला, सुरक्षित आणि लवचिक ठेवण्याचा प्रयत्न आहे. या घडामोडी महाराष्ट्र आणि भारताच्या पश्र्चिम किनाऱ्यासाठीही महत्त्वाच्या आहेत. मुंबई, जामनगर, रत्नागिरी आणि कोकणातील बंदरे ही इंडोपॅसिफिक व्यापार मार्गांशी थेट जोडली जातात. ऊर्जा आयात, खनिज पुरवठा आणि समुद्री वाहतूक यामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था अधिक गतिमान होऊ शकते. तसेच ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमधील भारतीय वंशाचे मोठे समुदाय महाराष्ट्राशी सांस्कृतिक व व्यावसायिक नात्यांनी जोडलेले आहेत. त्यामुळे या भागीदारींमुळे केवळ राष्ट्रीय नव्हे तर प्रादेशिक हितसुद्धा साधले जातील. 'क्ट इस्ट पॉलिसी'चा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे ईशान्य भारताला या प्रादेशिक धोरणाशी जोडण्याचा प्रयत्न. म्यानमार, थायलंड आणि आग्नेय आशियाशी भौगोलिक जवळीक असलेल्या ईशान्य राज्यांना व्यापार, पर्यटन आणि पायाभूत सुविधांच्या माध्यमातून नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात. 'क्ट इस्ट' अंतर्गत रस्ते, रेल्वे, जलमार्ग आणि डिजिटल कनेक्टिव्हिटी वाढवणे हे भारताच्या प्रादेशिक एकात्मतेसाठी महत्त्वाचे पाऊल आहे. इंडोपॅसिफिक प्रदेशातील देशांमध्ये विश्र्वास निर्माण करण्यासाठी केवळ संरक्षण भागीदारी नव्हे; तर शिक्षण, आरोग्य, नवोन्मेष आणि लोकांमधील संपर्कही तितकेच महत्त्वाचे ठरणार आहेत. त्यामुळे 'ॲक्ट इस्ट पॉलिसी' ही भारताच्या आर्थिक विस्ताराबरोबरच दीर्घकालीन सामरिक स्थैर्याचीही आधारशिला बनत आहे. 'ॲक्ट इस्ट पॉलिसी' आता केवळ घोषवाक्य राहिलेले नाही. ती वास्तवात उतरू लागली आहे. जपानचे तंत्रज्ञान व संरक्षण सहकार्य, इंडोनेशियाचे खनिज व समुद्री भागीदारी, ऑस्ट्रेलियाचे ऊर्जा व सुरक्षा संलग्नता आणि न्यूझीलंडचे व्यापार व प्रतिभा गतिशीलता हे सर्व मिळून भारताच्या उदयाला नवे बळ देतात. जर भारताने या करारांची अंमलबजावणी गांभीर्याने केली, तर ही धोरणात्मक दिशा इंडोपॅसिफिकमध्ये भारताच्या उदयाचा पाया ठरेल. ती चीनच्या आव्हानाला ठोस उत्तर देईल, प्रादेशिक स्थैर्याची हमी देईल आणि आर्थिक लवचिकतेचा मार्ग दाखवेल.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# अजित डोवाल यांचे राष्ट्रसेवेतील योगदान प्रेरणादायी - केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

- लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना प्रदान
- अजित डोवाल यांचा सन्मान हा राष्ट्रसेवा, राष्ट्रवाद आणि समर्पणाचा गौरव-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे । प्रतिनिधी :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा देत राष्ट्रवाद, शिक्षण, पत्रकारिता आणि सामाजिक जागृतीचा भक्कम पाया रचला. ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच'' हा त्यांचा विचार आजही प्रत्येक भारतीयाला प्रेरणा देत असून विकसित आणि सक्षम भारताच्या निर्मितीसाठी मार्गदर्शक ठरत आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.

लोकमान्य टिळक यांच्या १०६ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित समारंभात राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना प्रतिष्ठेचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार तथा पुरस्काराचे मानकरी अजित डोवाल, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माजी मंत्री रवींद्र चव्हाण, टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक, डॉ. गीताली टिळक, डॉ. प्रणिती टिळक आदी उपस्थित होते.




अमित शाह म्हणाले, लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यलढ्याला जनआंदोलनाचे स्वरूप देत सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सवांच्या माध्यमातून सांस्कृतिक राष्ट्रवादाची भावना जनमानसात रुजविली. 'केसरी' आणि 'द मराठा' या वृत्तपत्रांद्वारे निर्भीड पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला, तर राष्ट्रीय शिक्षणाच्या माध्यमातून देशभक्त नागरिक घडविण्याचे ऐतिहासिक कार्य केले.

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्या कार्याचा गौरव करतांना श्री. शाह म्हणाले, देशाच्या अंतर्गत व बाह्य सुरक्षेला बळकटी देण्यात त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. गुप्तचर यंत्रणेत अनेक आव्हानात्मक मोहिमा यशस्वीपणे पूर्ण करत त्यांनी राष्ट्रसेवेचा आदर्श निर्माण केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताची सुरक्षा

व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि निर्णायक बनविण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून, राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित अनेक धोरणात्मक निर्णयांच्या अंमलबजावणीत त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी त्यांची झालेली निवड अत्यंत योग्य असून त्यांच्या कार्यातून देशातील तरुणांना राष्ट्रसेवेची प्रेरणा मिळेल, असा विश्वासही शाह यांनी व्यक्त केला.

**राष्ट्रसेवा, राष्ट्रवाद आणि समर्पणाचा गौरव- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी अजित डोवाल यांची झालेली निवड ही राष्ट्रसेवा, राष्ट्रवाद आणि समर्पणाचा गौरव आहे. २०१४ पासून राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून त्यांनी भारताच्या सुरक्षा धोरणाला नवे परिमाण दिले. त्यांच्या 'प्रोॲक्टिव्ह डिटरन्स' च्या संकल्पनेमुळे भारताची सुरक्षा रणनीती अधिक प्रभावी झाली आहे. भारत आता केवळ हल्ले सहन करणारा देश नसून आवश्यकतेनुसार ठोस प्रत्युत्तर देण्याची क्षमता असलेले सामर्थ्यवान राष्ट्र बनल्याचे त्यांनी नमूद केले.

लोकमान्य टिळकांनी १८५७ नंतर भारतीय समाजात स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना चेतवून राष्ट्रवादाला नवी दिशा दिली, ते भारतीय राष्ट्रवादाचे जनक होते. टिळकांनी इंग्रजी साम्राज्याच्या काळात भारतीयांची

मानसिकता बदलत त्यांच्या मनात देशभक्तीच्या भावनेचे रोपण केले. सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंतीच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणत राष्ट्रीय एकात्मता बळकट करण्याचे कार्य त्यांनी केले. राष्ट्रहितासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या व्यक्तीलाच लोकमान्य टिळक यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे उचित असून अजित डोवाल हे त्या परंपरेला साजेसे व्यक्तिमत्त्व असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**युवकांनी समर्पण, त्याग आणि कर्तव्यभावनेने विकसित भारताच्या उभारणीत सहभागी व्हावे-अजित डोवाल**

पुरस्कार स्वीकारल्यानंतर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी लोकमान्य टिळकांचे राष्ट्रवाद, स्वातंत्र्य, समाजजागृती आणि विचारप्रबोधनाचे कार्य आजही तितकेच प्रेरणादायी असल्याचे सांगितले. हा पुरस्कार स्वीकारणे हा आपल्या आयुष्यातील मोठा सन्मान असल्याची भावना व्यक्त करत त्यांनी विकसित, आत्मनिर्भर आणि शक्तिशाली भारताच्या निर्मितीसाठी लोकमान्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले.

स्वातंत्र्य ही सहज मिळालेली देणगी नसून असंख्य स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग आणि बलिदानातून प्राप्त झालेली अमूल्य संपत्ती असल्याचे सांगत त्यांनी ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे'' हा संदेश आजच्या काळात विकसित भारताच्या राष्ट्रीय संकल्पात रूपांतरित करण्याची गरज व्यक्त केली. राष्ट्रहित हे सर्वांत सर्वोच्च मानून प्रत्येक नागरिकाने राष्ट्रनिर्माणात योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. युवकांनी लोकमान्य टिळकांचे विचार आणि 'गीतारहस्य'चा अभ्यास करून समर्पण, त्याग आणि कर्तव्यभावनेने विकसित भारताच्या उभारणीत सहभागी व्हावे, असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकमान्य टिळकांनी दिलेला स्वराज्याचा विचार आज राष्ट्रीय सुरक्षेच्या बळकटीत अधिक प्रभावीपणे प्रतिबिंबित होत असल्याचे सांगितले. देशाच्या सीमा, अंतर्गत सुरक्षा आणि गुप्तचर व्यवस्थेला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळवून देण्यात अजित डोवाल यांचे योगदान अतुलनीय असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांना मिळालेला पुरस्कार देशाच्या सुरक्षा यंत्रणा, सशस्त्र दल आणि राष्ट्रसेवेला वाहिलेल्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान असल्याचे श्री. शिंदे म्हणाले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराची गौरवशाली परंपरा राष्ट्रभक्ती, साहस, दूरदृष्टी आणि कर्तव्यनिष्ठेचा गौरव करणारी असल्याचे सांगितले. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना प्रदान करण्यात आलेला हा पुरस्कार केवळ एका व्यक्तीचा नसून देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेचाही सन्मान असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने जागतिक स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली असून गृहमंत्री अमित शाह आणि अजित डोवाल यांच्या योगदानामुळे देशाची अंतर्गत सुरक्षा, सीमासुरक्षा आणि दहशतवादविरोधी यंत्रणा अधिक सक्षम झाली आहे. भारतीय पोलीस सेवा, गुप्तचर व्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून विविध आव्हानात्मक परिस्थितीत प्रभावी नेतृत्व करत अजित डोवाल यांनी राष्ट्रसेवेत दिलेले योगदान देशासाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी सांगितले.

डॉ. रोहित टिळक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. १९८६ मध्ये लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराला सुरुवात करण्यात आली असून राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा विविध क्षेत्रातील व्यक्तींना त्यांच्या कार्यासाठी हा पुरस्कार देण्यात येतो. श्री. डोवाल यांना देशाच्या सुरक्षिततेसाठी केलेल्या बहुमूल्य योगदानासाठी हा पुरस्कार देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

## महत्त्वाचे...

### कार्तिक आर्यननं आसाम पूरग्रस्तांसाठी १ कोटींची दिली देणगी, मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी मानले आभार

**दैनिक आपला विदर्भ**

हैदराबाद : आसाम या राज्याला वर्षातील सर्वात भीषण पुराचा सामना करावा लागत आहे. हजारो कुटुंबांना या पूरामध्ये भीषण फटका बसला आहे. यामध्ये अनेकांचा मृत्यू झाला आहे. या कठीण काळात, काही हिंदी चित्रपटसृष्टीतील स्टार्सनं मदतीसाठी आपला एक हात पुढं केला आहेत. आधी सलमान खाननं मदत मोहीम सुरू केली आणि आता कार्तिक आर्यन हा मदतीसाठी पुढं आला आहे. कार्तिक आर्यननं आसाम पूरग्रस्तांच्या मदतीसाठी १ कोटी दान केले आहेत. त्यानं आसामच्या मुख्यमंत्र्यांच्या मदत निधीमध्ये १ कोटी दान केल्याचं समजत आहे. मुख्यमंत्री कार्यालयानं त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर त्याच्या योगदानाबद्दल माहिती दिली आणि मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी त्याचे आभार मानले आहे.

मुख्यमंत्री कार्यालयानं आपल्या एक्स अकाउंटवर लिहिलं, 'मुख्यमंत्री मदत निधीसाठी १ कोटींचे उदार योगदान दिल्याबद्दल अभिनेता कार्तिक आर्यनचं आभार. मुख्यमंत्री डॉ. हिमंता बिस्वा सरमा त्यांच्या या कौतुकास्पद कृतीची आणि राज्याच्या मदतकार्याला दिलेल्या वेळेवरच्या पाठिंब्याची प्रशंसा करताना त्यांनी पुढं लिहिलं, 'तुमच्या उदार योगदानानं मी खूप भारावून गेलो आहे. आसाममधील पुरामुळं बाधित झालेल्या लोकांना मदत करण्यासाठी तुमचा पाठिंबा महत्त्वपूर्ण ठरेल.' तसेच आयुष्मान खुरानानं देखील मुख्यमंत्री मदत निधीमध्ये ११ लाख रुपयांची मदत केली करून आसाममधील पूर-मदत कार्याला आपला पाठिंबा दर्शविला आहे. मुख्यमंत्री डॉ. हिमंता बिस्वा सरमा यांनी त्याचेही आभार मानले आहेत.

### शास्त्री मोहल्ला येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची १०६ वी जयंती उत्साहात साजरी

**दैनिक आपला विदर्भ**

**जालना।प्रतिनिधी :** शास्त्री मोहल्ला, जुना जालना येथील मातंग समाज सामाजिक सभागृहाम ध्ये साहित्यारत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

## बीएमसीला मुंबईची काहीही पडलेली नाही, घनकचरा व्यवस्थापनाच्या भोंगळ कारभारावर हायकोर्टाचे ताशेरे

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई। प्रतिनिधी :** मुंबई महानगरपालिका (बीएमसी) असंवेदनशील असून तिला आता मुंबईबद्दल आपलेपणाची भावनाच राहिलेली नाही. महापालिकेचे अधिकारी वातानुकूलित कार्यालयात बसून असतात, प्रभागात काय चाललंय? याची त्यांना अजिबात पडलेली नसते. या अधिकाऱ्यांना कसलीच परवा नाही, कोणतीही जाणीव नाही, अशा शब्दांत घनकचऱ्याच्या मुद्द्यावरून मुंबई हायकोर्टानं शुक्रवारी (३१ जुलै) मुंबई महापालिका प्रशासनाची चांगलीच खरडपट्टी काढली. कांजूरमार्ग येथील डम्पिंग ग्राऊंडवरील चुकीच्या घनकचरा व्यवस्थापनामुळे होणाऱ्या त्रासाबाबत कन्नमवार को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्यावतीनं हायकोर्टात ॲड. अभिजित राणे यांच्यामार्फत याचिका दाखल करण्यात आली आहे.

या याचिकेवर शुक्रवारी न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. या सुनावणीत हायकोर्टानं महापालिकेच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाला खडेबोल सुनावले. दक्षिण मुंबईतील महत्त्वाच्या पर्यटनस्थळांवर कचऱ्यामुळं



निर्माण होणारी घाण आणि दुर्गंधी देशविदेशातील पर्यटकांना सहन करावी लागत असल्याबद्दल हायकोर्टानं प्रशासनाला जाब विचारत आपण खरोखरच सुसंस्कृत समाजात राहतोय का? स्वातंत्र्य आणि लोकशाहीची हीच किंमत आहे का? असे सवालही उपस्थित केले.

वारसास्थळांशेजारीच कचार डेपो, हायकोर्टाची तीव्र नाराजी : दक्षिण मुंबईतील राजाबाई टॉवर, मुंबई हायकोर्ट, सत्र न्यायालय आणि फोर्ट परिसरातील हॉर्निमन सर्कलसारख्या वारसा स्थळांच्या जवळ कचऱ्याचे ट्रक आणि कचरा संकलन केंद्रे उभी करताच कशी? असा सवालही यावेळी हायकोर्टानं उपस्थित केला. फोर्ट परिसरातील हॉर्निमन सर्कलजवळ सध्या भला मोठा कचरा डबा ठेवण्यात आल्यानं संपूर्ण परिसरात दुर्गंधी आणि अस्वच्छता पसरतेय. याबाबत संबंधित वॉर्ड अधिकाऱ्यांना अनेकदा तक्रार देऊनही सात दिवस उलचून गेले तरीही कारवाई झाली नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त करतानाच, यापुढंही अशी निष्क्रियता कायम राहिल्यास संबंधित अधिकाऱ्यांची गय करणार नाही, असा थेट इशाराच यावेळी हायकोर्टानं दिला.

परदेशी पर्यटकांसमोर आपण काय चित्र ठेवतोय? : दिवसभर या परिसरात देश-विदेशातले पर्यटक येत असतात, ते आपल्या देशाची काय प्रतिमा घेऊन जात असतील?, अशी खंतही यावेळी न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांनी बोलून दाखवली. परदेशात गेल्यावर आपले नागरिक कचरा आणि इतर नियमांचं काटेकोर पालन करतात, मात्र आपल्या देशात फिरताना ते रस्त्यावर कचरा टाकण्यास जराही मागेपुढे पाहत नाहीत. स्वच्छ पर्यावरण हवं असेल, तर नागरिकांनाही स्वच्छता राखण्याचं मूलभूत कर्तव्य आधी पार पाडावं लागेल, असंही यावेळी हायकोर्टानं अधोरेखित केलं. तसंच आपल्या कामात दिरंगाई करणाऱ्या महापालिका अधिकाऱ्यांनी नियमभंग करणाऱ्यांवर कठोर करताना कोणतीही तडजोड करू नये, असंही यावेळी हायकोर्टानं स्पष्ट केलं.

घनकचरा व्यवस्थापन करताना कायदा-सुव्यवस्थेची समस्या निर्माण झाल्यास महानगरपालिकेनं तातडीनं पोलिसांची मदत घ्यावी, असे आदेश देत हायकोर्टानं याप्रकरणाची सुनावणी १२ ऑगस्टपर्यंत तहकूब केली आहे.

## राज्याला मुसळधार पावसाचा तडाखा; अनेक जिल्ह्यांना अतिवृष्टीचा इशारा, पुढील २४ तास महत्त्वाचे

**मुंबई। प्रतिनिधी** :महाराष्ट्रात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून, राज्यातील अनेक जिल्ह्यांना म ुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाने कोकण, घाटमाथा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भातील काही जिल्हे तसेच मराठवाड्यातील काही भागांत पुढील २४ तासांत जोरदार पावसाची शक्यता वर्तवली आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वारे वाहण्याचा अंदाजही व्यक्त करण्यात आला आहे.

कोकण किनारपट्टी, मुंबई महानगर प्रदेश, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या भागांमध्ये पावसाचा प्रभाव कायम राहण्याची शक्यता आहे. घाटमाथ्यावरील भागांतही मुसळधार सरींचा अंदाज आहे. विदर्भातील अमरावती, यवतमाळसह काही जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीचा धोका व्यक्त करण्यात आला आहे. पावसाचा जोर वाढल्यास नदी-नाले दुथडी भरून वाहणे, सखल भागांमध्ये पाणी साचणे, दरडी कोसळणे तसेच वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवली असून, नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

गेल्या आठवडाभरात राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. कोकण, घाटमाथा आणि पश्चिम महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस झाला. काही जिल्ह्यांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली असून शेती, रस्ते आणि दळणवळण व्यवस्थेवर त्याचा परिणाम झाला.

पुणे परिसरात जुलै महिन्यात विक्रमी पावसाची नोंद झाली असून अनेक वर्षातील उच्चांक मोडल्याचे हवामान विभागाच्या आकडेवारीतून समोर आले आहे.

खरीप हंगामाला दिलासा; मात्र अतिवृष्टीचे नवे संकट - जून महिन्यात राज्यात पावसाची मोठी तूट होती. त्यामुळे खरीप पिकांच्या पेरणीबाबत चिंता निर्माण झाली होती. मात्र, जुलैच्या उत्तरार्धात मान्सून सक्रिय झाल्याने पावसाने वेग घेतला आणि अनेक भागांत पेरण्यांना गती मिळाली. धरणांच्या पाणीसाठ्यातही वाढ झाली आहे. मात्र अतिवृष्टी झाल्यास उभ्या पिकांचे नुकसान, मातीची धूप आणि पायाभूत सुविधांवर परिणाम होण्याची शक्यता असल्याने प्रशासन आणि शेतकऱ्यांसमोर नवे आव्हान निर्माण झाले आहे.

हवामान विभागाच्या इशाऱ्यानंतर प्रशासनाने नागरिकांना अनावश्यक प्रवास टाळण्याचे, नदी-नाल्यांच्या परिसरात न जाण्याचे आणि दरडप्रवण भागात विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. म ासेमारांना समुद्रात न जाण्याचा सल्ला देण्यात आला असून, आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

दरम्यान, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात राज्याच्या बहुतांश भागांत सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याचा अंदाजही हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

## मनोरुग्ण संजय राऊत, उद्धव ठाकरेंना मानसोपचाराची गरज भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांची घणाघाती टीका

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई। प्रतिनिधी :** संजय राऊत, तुम्हाला आणि तुमचे मालक उद्धव ठाकरेंना यांना अभिजीत दिपकेमध्ये विष्णूचा अवतार दिसतो, याला मानसिक रुग्णावस्था म्हणतात. तुम्हाला मानसिक उपचाराची गरज आहे आणि तुमचा उपचार महाराष्ट्रात होणार नसल्याने आम्ही वर्गणी काढून सिंगापूरच्या रुग्णालयात तुम च्यावर मानसिक उपचार करू. अभिजीत दिपकेची विष्णूच्या अवताराबरोबर तुलना करता आणि पंतप्रधान नरेंद्र मोदीजींवर टीका करता यावरूनच तुमच्या गोळ्या संपलेल्या आहेत, हे महाराष्ट्राच्या लक्षात आले आहे, असा प्रहार भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शनिवारी केला. भाजपा प्रदेश कार्यालयातील पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

महाराष्ट्रातल्या जनतेने पळवून लावल्याने तुमची पळता भुई थोडी झाली आहे. अमितभाई शाह या देशाचे गृहमंत्री आहेत आणि त्यांनी कलम ३७० हटवले. पळून जाणाऱ्यांमधले अमितभाई नाहीत, तर संजय राऊत आणि उद्धव ठाकरे हे दोघे पळपुटे आहेत. तुम्हाला वंदे मातरम् सक्तीचे विधेयक चालत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमितभाई शाह यांनी त्याबाबत संसदेत कायदा पारित केला आणि आता तुमच्यासारख्या देशद्रोह्यांच्या बुडाला आग लागल्यानेच तुम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमितभाई यांच्यावर टीका करता, असे श्री. बन यांनी सुनावले.

मुळात संजय राऊत हे उबाठा गटाची जमीन भुसभुशीत करणारे गांडूळ आहेत, असे सांगून श्री. बन म्हणाले, गांडुळासारखा दुतोंडीपणा तुम्ही करता हे महाराष्ट्राने पाहिले आहे. जयकुमार गोरे यांच्यावर टीका करू नका. ते काय आहेत, हे महाराष्ट्राला माहिती आहे. त्यांना चार वेळा जनतेने निवडून दिले आहे आणि तुम्हाला अजून भांडुपचा नगरसेवकही निवडून आणता आला नाही. गृहमंत्रालयाचा लिलाव करण्याची कुवत आणि वकूब तुमच्यात नाही. तुमच्या उबाठा गटाचाच लिलाव झाला आहे. स्वत:च्या खासदारकीचा आणि हिंदुत्वाचा लिलाव करून तुम्ही तुमचा पक्ष काँग्रेसच्या दावणीला बांधला आहे. आता या देशाचा लिलाव करण्याचे स्वप्न तुम्ही पाहत आहात. परंतु या देशातील तरुणाई आणि देशातील नागरिक पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या पाठीशी आहेत. तुमचे हे स्वप्न कधीही पूर्ण होणार नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी मोठ्या म नाने या तरुणांशी संवाद साधत सांगितले की, एखादा तरुण चुकला तर त्याला



सोबत घेतले पाहिजे. आपल्याला देश पुढे न्यायचा आहे, भारताचे भविष्य घडवायचे आहे. सगळ्यांना सोबत येऊन देशासाठी काम करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि या तरुणांचे नाते आजोबा आणि नातवाचे आहे. संजय राऊत मात्र कंसमामा प्रमाणे वागत आहेत. जेन झीशी तुम्हाला काही काहीही देणे-घेणे नाही. तुम्हाला फक्त तुमची राजकीय पोळी भाजायची आहे.

स्वत:ची खासदारकी आणि भावाची आमदारकी टिकवायची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी या तरुणांसोबत आहेत. याच तरुणांच्या आशीर्वादाने २०१४ ला नरेंद्र मोदीजी पंतप्रधान झाले, २०१९ आणि २०२४ ला पुन्हा सत्तेत आले आणि याच तरुणांच्या पाठिंब्यामुळे २०२९ मध्येही पंतप्रधान नरेंद्र मोदीजी चौथ्यांदा पंतप्रधान म्हणून शपथ घेतील. मतांच्या माध्यमातून तुमच्या पक्षाचा वध करण्याचे काम महाराष्ट्रातल्या जनतेने याआधी केले आहे आणि २०२९ मध्येही तुम्हाला घरी बसवले जाईल, अशा शब्दात श्री. बन यांनी खरडपट्टी काढली.

CMYK



# केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव शेतकऱ्यांच्या बांधावर

## » जळगांव जामोद, संग्रामपुर तालुक्यातील अतिवृष्टी बाधीत गावांची केली पाहणी
## » नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे दिले प्रशासनाला निर्देश

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** गेल्या दोन दिवसापुर्वी अतिवृष्टी पावसाने बाधीत झालेल्या बुलढाणा जिल्हयातील जळगांव जामोद आणि संग्रामपुर तालुक्यातील बाधीत क्षेत्राची पाहणी आज केंद्रिय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन केली आहे. नुकसानीचे पंचनामे त्वरीत करुन शासनाला सादर करण्याचे निर्देशही प्रशासनाला दिले आहेत.

३० आणि ३१ जुलै ला बुलढाणा जिल्हयात अतिवृष्टी सदृष्य पाऊस झाला या पावसामुळे जिल्हयातील अनेक नागरीकांचे जनजिवन विस्कळीत झाले होते. तर संग्रामपुर आणि जळगांव जामोद तालुक्यातील गावांना मुसळधार पावसाचा सर्वाधीक फटका बसला होता. ३१ जुलै च्या सकाळी जिल्हाधिकारी डॉ.प्रविण



देवरे यांच्याशी दुरध्वनीवरुन संपर्क साधुन झालेल्या अतिवृष्टीची माहिती घेतली.

प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेण्याच्या सुचना त्यांना यावेळी केल्या होत्या. तर आज १ ऑगस्ट रोजी जिल्हयात आल्यानंतर तात्काळ जळगांव



जामोद आणि संग्रामपुर तालुकयातील चावरा, इलोरा, मडाखेड खु. मडाखेड बु., काजेगांव, बोराळा बु., बोराळा खु., खेर्डा खु., खेर्डा बु., चांगेफळ रुधाणा वकाणा येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीचे पाहणी केली.

यावेळी तहसिलदार पवन पाटील, अजाबराव वाघ, कृषी अधिकारी रमेश वाघ, गटशिक्षणाधिकारी एश्वर्या कोरे उपस्थित होत्या. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पिकाचे तसेच घरांच्या पडझडीचे तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश प्रशासनाला यावेळी दिले. तर शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला आलेल्या संकटाला सामोरे जा सरकार तुमच्या पाठीशी आहे अशी ग्वाही शेतकऱ्यांना दिली. यावेळी त्यांच्या सोबत शिवसेनेचे सहसंपर्क प्रमुख शांताराम दाणे, जिल्हाप्रमुख संतोष डिवरे, उपजिल्हाप्रमुख देविदास घोपे, भाजपा नेते गजानन सरोदे, बंडु पाटील, युवासेना लोकसभा अध्यक्ष चेतन घिवे, तालुका प्रमुख केशव ढोकणे, कैलास कडाळे राष्ट्रवादीचे चेतन देशमुख, रंगराव देशमुख, मोहन ठाकरे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

**वृत्तविशेष...**

### बुलढाण्यात बेकायदेशीर गर्भलिंग निदानावर धाड; अकोला आरोग्य विभागाची मोठी कारवाई

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** अकोला येथील आरोग्य उपसंचालक कार्यालयाच्या पथकानं बुलढाणा शहरातील सुंदरखेड परिसरातील तार कॉलनीतील एका घरावर आज सकाळी छापा टाकला. या ठिकाणी अवैध गर्भलिंग निदान केलं जात असल्याच्या संशयावरून ही कारवाई करण्यात आली. छाप्यामध्ये मोठ्या प्रमाणात वैद्यकीय औषधे, विविध प्रकारची इंजेक्शने, गोळ्या (टॅब्लेट्स) तसेच इतर वैद्यकीय साहित्य जप्त करण्यात आल्याची माहिती डॉ. चिमणकर यांनी दिली.

घरावर टाकला छापा : आरोग्य विभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, संबंधित ठिकाणी अवैध गर्भलिंग निदान सुरू असल्याची प्राथमिक माहिती मिळाली होती. त्यानंतर अधिकाऱ्यांनी एका डमी महिलेला सोनोग्राफीसाठी पाठवून सापळा रचला. संबंधित महिलेनं दिलेल्या माहितीच्याआधारे आरोग्य विभागानं कारवाई केली. या कारवाईदरम्यान ॲक्युपंक्चर तज्ज्ञ डॉ. गवई यांच्या घरी छापा टाकण्यात आला. यावेळी डॉ. गवई आणि एमबीबीएसच्या तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या त्यांच्या मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतलं. दोघांविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

आरोग्य विभागाने छापा टाकून केली कारवाई : विशेष म्हणजे, सुमारे सहा महिन्यांपूर्वीही याच ठिकाणी आरोग्य विभागानं छापा टाकून कारवाई केली होती. त्यानंतरही पुन्हा अवैध पद्धतीनं गर्भलिंग निदान सुरू असल्याची माहिती मिळाल्यानं ही दुसरी कारवाई करण्यात आली. या प्रकरणाची माहिती बुलढाणा जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. बिराजदार आणि अकोला आरोग्य उपसंचालक कार्यालयातील डॉ. चिमणकर यांनी दिली. त्यांनी सांगितलं की, अवैध गर्भलिंग निदान हा गंभीर गुन्हा असून अशा प्रकरणांवर कठोर कारवाई सुरूच राहील. जप्त करण्यात आलेल्या साहित्याची तपासणी सुरू असून, पुढील तपासासाठी पोलीस आणि आरोग्य विभाग संयुक्तपणे काम करत आहेत.

प्रकरणाचा सखोल तपास सुरू : आरोग्य विभागानं नागरिकांना आवाहन केलं आहे की, अशा प्रकारच्या अवैध कृत्यांची माहिती मिळाल्यास तातडीनं संबंधित अधिकाऱ्यांना कळवावी. गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याअंतर्गत अशा गुन्ह्यांसाठी कठोर शिक्षेची तरतूद असून, या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असल्याचं अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं आहे.

### मुंबईत वीज इतकी महाग का? नेटकऱ्याच्या पोस्टमुळे रंगली चर्चा

**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबई आणि नवी मुंबईतील वाढत्या वीजबिलांबाबत सोशल मीडियावर पुन्हा एकदा चर्चा रंगली आहे. एका एक्स (पूर्वीचे ट्विटर) युजरने आपल्या वीजबिलाचा अनुभव शेअर करत मुंबईतील वीजदरांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दिल्ली, बेंगळुरू आणि राजस्थानमधील दरांची तुलना करत त्याने मुंबईतील ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचा दावा केला आहे.

@pritishposwal या एक्स हँडलवरून शेअर करण्यात आलेल्या पोस्टमध्ये संबंधित युजरने लिहिले की, ''मुंबई आणि नवी मुंबईत वीज इतकी महाग का आहे? राजस्थान, दिल्ली-एनसीआर किंवा बेंगळुरूमध्ये इतके जास्त दर मी कधी पाहिले नाहीत.'' त्याने पुढे आपल्या वीजबिलातील विविध अतिरिक्त शुल्कांचाही उल्लेख केला. वीजदरांव्यतिरिक्त व्हीलिंग चार्ज, वीज शुल्क आणि इंधन समायोजन शुल्क यामुळे अंतिम बिल अपेक्षेपेक्षा खूपच वाढल्याचे त्याने सांगितले.

## समता आणि सामाजिक न्यायाचा विचार जपूया

### अणणाभाऊ साठे जयंतीनिमित्त नगराध्यक्ष किशोर गारोळे यांचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर । प्रतिनिधी :** साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मेहकर येथील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात शनिवारी अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी मेहकर नगराध्यक्ष किशोर गारोळे यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून वंचित, शोषित आणि कष्टकरी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. समता, स्वाभिमान, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा त्यांनी दिलेला संदेश आजही तितकाच प्रेरणादायी असून, त्यांच्या विचारांचा वारसा



जपणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमास नगरसेवक महेश रिंढे, नगरसेवक नितीन तुपे, नगरसेवक सतीश ताजने, नगरसेवक नीलेश मानवतकर, नगरसेवक अमर घोडे, माजी नगरसेवक सादिक बागवान, हसन गवळी यांच्यासह नगरपरिषदेचे पदाधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला अभिवादन करत सामाजिक समता आणि परिवर्तनाच्या विचारांचा प्रसार करण्याचा निर्धार व्यक्त केला.

### उपसंचालक प्रवीण टाके यांची छत्रपती संभाजीनगर येथे बदली

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे कोल्हापूर येथील उपसंचालक प्रवीण टाके यांची बदली छत्रपती संभाजीनगर येथे झाल्याने विभागीय माहिती कार्यालयात त्यांना निरोप देण्यात आला.

श्री टाके यांची छत्रपती संभाजीनगर येथे तर जिल्हा माहिती अधिकारी (कोल्हापूर) सचिन अडसूळ यांची सिंधुदुर्ग येथे बदली झाली. त्यांच्या ठिकाणी सातारा येथील जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे यांची जिल्हा माहिती अधिकारी कोल्हापूर या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे तसेच त्यांच्याकडेच उपसंचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. सिंधुदुर्ग येथील जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत यांची अहिल्यानगर येथे बदली झाली श्री टाके व श्री अडसूळ यांना नुकताच विभागीय माहिती कार्यालय कोल्हापूर येथे आयोजित कार्यक्रमात निरोप देण्यात आला.यावेळी शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर,माहिती अधिकारी फारूक बागवान , सहायक संचालक वृषाली पाटील,पत्रकरिता विभाग प्रमुख प्रा.निशा मुढे,विभागीय व जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचाऱ्यांसह माध्यम क्षेत्रातील इतर मान्यवर उपस्थित होते.येत्या सोमवारी हे सर्व अधिकारी नव्या नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होणार आहेत.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**बुलढाणा । प्रतिनिधी :** साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते

## किनगाव जट्टू येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी



**दैनिक आपला विदर्भ**

**किनगाव जट्टू :** येथील बस स्थानक परिसरात मंडप उभारून आकर्षक रांगोळी काढून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती १ ऑगस्ट रोजी लहुजी मित्र मंडळाच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी निलेश महाजन हे होते प्रमुख उपस्थितीमध्ये बीबी पोलीस स्टेशनचे ठाणेदार गजानन सोनटक्के काकड क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सहदेव लाड फुले शाहू आंबेडकर विचार मंचाचे अध्यक्ष राजेश नागरे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष रामप्रसाद खरात सावरगाव तेलीचे सरपंच जगाराव आडे विश्वनाथ वाघमारे माधवराव बिन्नीवाले सिताराम जावळे आत्माराम सातपुते सर्जेराव तौर उत्तमराव मिसाळ गजानन मुर्तडकर अशोक साळवे आदी मान्यवर उपस्थित होते सर्वप्रथम मान्यवराच्या हस्ते अण्णाभाऊ साठे व महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात केली.

यावेळी मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता भगवान मिसाळ संतोष साळवे अमोल साळवे संतोष कांबळे संतोष मिसाळ कार्तिक कांबळे विशाल मिसाळ गणेश मिसाळ यांच्यासह मित्र मंडळांनी अथक परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश नागरे यांनी केले तर आभार प्रदर्शन उत्तमराव मिसाळ यांनी मानले .

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे विचार समाज परिवर्तनाची प्रेरणा; आ. सिद्धार्थ खरात यांचे अभिवादन









**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर । प्रतिनिधी :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मेहकर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे उभारण्यात आलेल्या त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास आमदार सिद्धार्थ खरात यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. त्यानंतर मेहकर येथील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जनसंवाद कार्यालयात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी. युवा सेना तालुका प्रमुख अँड आकाश घोडे. गोपाल गायकवाड. कृषी उत्पन्न बाजार समिती लोणार संचालक तेजराव घायाळ.तालुका संघटक डॉ. नंदकिशोर देशमुख, दत्ता घनवट नगरसेवक निलेश मानवतकर यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवसैनिक आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला कृतज्ञतापूर्वक अभिवादन करत त्यांच्या विचारांचा जागर कायम ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, शाहिरी आणि लोककलेच्या माध्यमातून कष्टकरी, शोषित, वंचित आणि उपेक्षित समाजाला आवाज दिला.

समता, सामाजिक न्याय, स्वाभिमान आणि मानवतेचा संदेश त्यांनी आपल्या प्रत्येक शब्दातून दिला. त्यांचे विचार आजही समाज परिवर्तनाची प्रेरणा असून त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास, न्याय आणि सन्मान पोहोचविण्याचा संकल्प आपण अधिक दृढ केला पाहिजे. कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक परिवर्तनासाठीच्या संघर्षपूर्ण जीवनकार्याचे स्मरण करण्यात आले.

त्यांच्या साहित्याने आणि विचारांनी समाजाला नवी दिशा दिली असून सामाजिक समतेच्या चळवळीला बळ दिल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले.

CMYK